

जागतीक पर्यावरण दिन विशेष
पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



१८ वर्षांनी आरसीबीचे जेतेपदावर शिक्कामोर्तब
पान ४ वर

वेर्णा, गुरुवार, ५ जून २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 273 | Verna, | facebook.com/dainikherald | Thursday 5 June 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या तारखांची घोषणा

पहलगाम दहशतवादी हल्ला आणि ऑपरेशन सिंदूरबाबत संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणी विरोधी पक्ष सातत्याने करत असताना केंद्र सरकारने बुधवारी थेट संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या तारीखांची घोषणा करून टाकली. आगामी पावसाळी अधिवेशन २१ जुलै ते १२ ऑगस्ट या कालावधीत होईल असे केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी बुधवारी सांगितले. एक्सवरील पोस्टवरून पावसाळी अधिवेशनाची घोषणा करताना रिजिजू यांनी स्पष्ट केले की सरकार संसदेच्या नियमांनुसार सर्व मुद्द्यांवर चर्चा करण्यास तयार आहे. रिजिजू म्हणाले की संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांच्या अध्यक्षतेखालील संसदीय कामकाज विषयक मंत्रिमंडळ समितीने या तारखा ठरवल्या असून त्या आता राष्ट्रपतींकडे पाठवल्या जातील.

प्रत्येक अधिवेशनच आमच्यासाठी विशेष आहे. अशी टिप्पणी करताना रिजिजू म्हणाले की नियमांनुसार पावसाळी अधिवेशनात सर्व महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करता येते. दोन्ही सभागृहांच्या व्यवसाय सल्लागार समित्या (बीएसई) चर्चा करायच्या मुद्द्यांवर निर्णय घेतील. सरकारच्या नियोजनानुसार पावसाळी अधिवेशनाच्या निमित्ताने तीन महिन्यांहून अधिक काळानंतर संसदेची दोन्ही सभागृहे २१ जुलै रोजी सुरू होणार आहेत.

---

### युक्रेनचा रशियावर दुसरा मोठा हल्ला

**मॉस्को, दि. ४ :** रशिया–युक्रेन संघर्ष पुन्हा एकदा धगधगू लागला आहे. अवघ्या ७२ तासांत युक्रेनने रशियावर दुसरा मोठा हल्ला करत क्रिमिया पूल पुन्हा उद्ध्वस्त केला आहे. रशिया आणि क्रिमियाला जोडणाऱ्या या महत्त्वाच्या पूलाखाली पाण्यात ११०० किलो स्फोटके लावून हा भयंकर हल्ला करण्यात आला.

या पुलावर २०२२ पासून आजवर तिसऱ्यांदा हल्ला झाला आहे. यापूर्वी १ जूनला युक्रेनने ड्रोनद्वारे रशियाचे पाच लष्करी तळ उडवले होते आणि ४१ लढाऊ विमाने नष्ट केल्याचा दावा केला होता.

यूक्रेनच्या सुरक्षा एजन्सी एसबीयूने अधिकृतपणे सांगितले की, मंगळवारी पहाटे ४.४४ वाजता खांबांवर स्फोट घडवून आणले गेले. या हल्लयामुळे पूल मोठ्या प्रमाणात नुकसानग्रस्त झाला. सकाळपासून संध्याकाळपर्यंत वाहतूक थांबवण्यात आली होती. एसबीयू प्रमुख वासुल मलियूक यांनी याआधी १ जूनच्या हल्ल्यामुळे रशियाचे ७ अब्ज डॉलर्सचे नुकसान झाल्याचे सांगितले होते. आजचा पूलहल्लाही मलियूक यांच्या देखरेखीखालीच पार पडला.

---

### भारतात या दिवसात होणार जणगणना

**नवी दिल्ली :** भारतात १ मार्च २०२७ पासून जनगणना सुरू होईल. पण जम्मू काश्मीर, लडाख आणि उत्तराखंडमध्ये अनेक दुर्गम परिसर असल्यामुळे या राज्यांमधील जनगणना १ ऑक्टोबर २०२६ पासून सुरू करण्याचे नियोजन सुरू आहे, अशी माहिती केंद्र सरकारने बुधवार ६ जून २०२५ रोजी रोजी दिली. मोदी सरकारने केलेल्या घोषणेनुसार यंदाच्या जनगणनेत जातीची माहिती पण नोंदवली जाणार आहे. जनगणना करताना नागरिकांना जे अनेक प्रश्न विचारले जातात त्यातच जात हा पण एक प्रश्न असेल.

सात दशकांहून अधिक काळानंतर पहिल्यांदाच देशव्यापी जनगणनेत जात गणना समाविष्ट केली जाईल. हे पाऊल एक मोठा धोरणात्मक बदल असल्याचे केंद्र सरकारने सांगितले. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वातले सरकार दिलेल्या आश्वासनांना पाळणारे सरकार आहे. गतिमान कारभार, कारभारातील पारदर्शकता याला हे सरकार प्राधान्य देते. हीच बाब जनगणना कार्यक्रम राबविण्याच्या निमित्ताने पुन्हा एकदा अधोरेखित होणार असल्याचे केंद्र सरकारने सांगितले.

# आरसीबीच्या विजयोत्सवात ११ मृत्यू; बंगळुरूत हाहाकार

## चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर चेंगराचेंगरी | पोलिस लाठीचार्ज, वाहतूक कोलमडली, राज्य सरकारवर टीकेची झोड

**बेंगळुरू, दि. ४ :**

**१८ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाच्या आयपीएल मधल्या पहिल्या विजयानंतर आयोजित करण्यात आलेल्या सोहळ्याला गंभीर दुर्घटनेने घेरले . चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर झालेल्या भीषण चेंगराचेंगरीत ११ चाहत्यांचा मृत्यू झाला असून, किमान २४ जण जखमी झाले आहेत. त्यापैकी काहींवर रुग्णालयात गंभीर अवस्थेत उपचार सुरू आहेत.**

स्टेडियमबाहेर जमलेली गर्दी अंदाजाच्या कितीतरी पट होती. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एक लाख चाहत्यांच्या उपस्थितीचा अंदाज वर्तवण्यात आला होता, परंतु प्रत्यक्षात दोन ते तीन लाख लोकांनी परिसरात गर्दी केली. यामुळे परिस्थिती बिघडली. नियंत्रणाबाहेर गेलेल्या गर्दीला पांगवण्यासाठी पोलिसांनी लाठीचार्ज करावा लागला, याचे दृश्य एएनआयने प्रसारित केले आहे.

या दुर्घटनेबद्दल कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि उपमुख्यमंत्री डी.के. शिवकुमार यांनी तीव्र दुःख व्यक्त केले. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी ट्विटमध्ये म्हटले की, या दुर्घटनेच्या वेदनेमुळे विजयाचा आनंदही पुसून टाकला आहे. मृतांच्या आत्म्याला शांती लाभो. सुरक्षितता ही सर्वोच्च प्राधान्य असावी. तर डी. के. शिवकुमार यांनीही एक्सवर शोक व्यक्त करत लिहिले, जल्लोष महत्वाचा असतो, पण तो जीवापेक्षा कधीच मोठा नसतो.






विजयानंतर लाल झेंडे, १८ नंबरच्या जर्सी घालून हजारो चाहते विविध भागांतून स्टेडियमकडे धाव घेत होते. शहरात रिक्षा, टॅक्सी मिळत नव्हत्या. जे वाहनचालक तयार होते, त्यांनी चढ्या दरात भाडे आकारले. काही चाहत्यांना स्टेडियमपासून तीन किलोमीटरवर उतरावे लागले. अशा वेळी, उघड्या बसमधून निघणाऱ्या मिरवणुकीला पोलिसांनी वाहतूक अडथळ्यामुळे परवानगी नाकारली. तरीही चाहत्यांनी मैदानाभोवती मोठी गर्दी केली आणि एकच धावपळ सुरू झाली.

स्टेडियमच्या आतील खुर्च्या भरल्यामुळे आम्हाला आत जाऊ दिले नाही. परतही जाता येत नाही, बाहेर गेटवर प्रचंड गर्दी आहे. अशा वेळी गेट उघडल्यास मोठ्या संख्येने लोक आत येतील. आधीच अनेक जखमी झाले आहेत.असे उपस्थित चाहत्यांनी माध्यमांना सांगितले.

कर्नाटक सरकारच्या वतीने बुधवार दुपारी ४ वाजता आरसीबी संघाच्या सत्कारासाठी समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, राज्यपाल तसेच मंत्रिमंडळाचे इतर सदस्य उपस्थित होते. विराट कोहली व इतर खेळाडूंनी स्टेडियममध्ये उपस्थित राहून चाहते व माध्यमांसमोर ट्रॉफी दाखवली. परंतु अचानक झालेल्या पावसाने आणि अनियंत्रित गर्दीने ही परिस्थिती चिघळली. संघाला हॉटेलमध्ये परतावे लागले.

ही घटना उघडकीस येताच राजकीय आरोप–प्रत्यारोपांची मालिका सुरू झाली. भाजपचे प्रवक्ते शहजाद पूनावाला यांनी या दुर्घटनेसाठी थेट काँग्रेस सरकारला जबाबदार धरले. ही राज्य पुरस्कृत निष्काळजीपणा व हत्या आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्र्यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. मृत्यूंच्या बातम्या समजताच, अनेकांनी सुरक्षित ठिकाणी जायचा प्रयत्न केला. त्यामुळे मेट्रो स्टेशनवर मोठी गर्दी झाली. प्रशासनाने स्टेडियमलगतची सर्व मेट्रो स्टेशन्स तातडीने बंद केली.

---

# १९ डिसेंबर पर्यंत सर्व वनहक्क दावे निकाली काढणार : मुख्यमंत्री

टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ४ :** राज्य सरकारने येत्या १९ डिसेंबर पर्यंत सर्व वनहक्क दावे अंतिम करण्याचे स्पष्ट उद्दिष्ट समोर ठेवले आहे, अशी घोषणा मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी बुधवारी केली. ते मंत्रालयात पत्रकारांशी बोलत होते.

मुख्यमंत्र्यांनी माहिती दिली की, एकूण १०,५०० वनहक्क दाव्यांपैकी फक्त ८७१ दावे आतापर्यंत निकाली काढण्यात आले असून, ९४९ दावे गैर–वन जमिनीशी संबंधित असल्याने फेटाळण्यात आले आहेत. या प्रक्रियेला आता गती देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. ते म्हणाले, १५० मंजूर सनद दावेदारांना ५ जून २०२५ रोजी देण्यात येणार आहेत. ही कारवाई प्रक्रिया पारदर्शकतेने आणि वेळेत पूर्ण करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे.

मुख्यमंत्र्यांनी याकडे लक्ष वेधले की, वनहक्क कायद्यानुसार दावा प्रक्रिया २००६ मध्ये सुरू झाली असली तरी २०१९ पर्यंत एकही दावा मंजूर करण्यात आलेला नव्हता. आता मात्र सरकारने प्रक्रिया वेगवान करण्यासाठी विविध उपाययोजना आखल्या आहेत.

याअंतर्गत, १४ जून २०२५ रोजी केपे, काणकोण, सांगे, फोंडा, धारबांदोडा आणि सत्तरी या सहा तालुक्यांमध्ये १,९६५ प्रलंबित दावे निकाली काढण्यासाठी विशेष शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. दावेदारांना अर्ज प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे सोबत आणण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

तसेच, १८ जून २०२५ रोजी उपजिल्हाधिकाऱ्यांकडे प्रलंबित असलेल्या ३,९७० प्रकरणांवर सुनावणी घेऊन निर्णय घेतला जाणार आहे. याआधी ९ जून रोजी फोंडा येथे आयोजित कार्यक्रमात मंजूर झालेल्या १५० सनद वितरित केल्या जातील, अशी माहितीही मुख्यमंत्र्यांनी दिली. याशिवाय, ज्या ग्रामपंचायतींमध्ये अद्याप दावे प्रलंबित आहेत, तेथे २१ जून २०२५ रोजी विशेष ग्रामसभा घेऊन प्रकरणे निकाली काढण्याचा शासनाचा निर्धार आहे. पान २ ▶

---

# पणजी मार्केटमधील अग्निशमन यंत्रणांची १२ जून रोजी तपासणी

टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ४ :** पणजी मार्केटमध्ये पाच वर्षांनंतर पहिल्यांदाच १२ जून रोजी सकाळी ११ वाजता अग्निशमन यंत्रणांची तपासणी करण्यात येणार आहे. अग्निशमन आणि आपत्कालीन सेवा संचालनालयाच्या पथकाकडून ही तपासणी करण्यात येणार असून, ती पणजी महानगरपालिकेच्या समन्वयाने केली जाईल. हे मार्केट २००३ साली बांधण्यात आले होते आणि त्याचवेळी अग्निशमन उपकरणांची प्रतिष्ठापना करण्यात आली होती. विशेष म्हणजे, गेल्या पाच वर्षांत प्रथमच या यंत्रणेची अधिकृत तपासणी केली जाणार आहे.

संचालनालयाकडून या यंत्रणांची कार्यक्षमतेसह सध्याच्या स्थितीचे मूल्यांकन केले जाईल. याबाबत माहिती देताना अग्निशमन विभागातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, अग्निशमन विभाग दरवर्षी तपासणी करत नाही, कारण ही जबाबदारी महानगरपालिकेवर अवलंबून आहे. जर महानगरपालिकेला ना हरकत प्रमाणपत्र हवे असेल, तर त्यांनी लेखी पत्राद्वारे अहवाल मागवावा लागतो.

ते पुढे म्हणाले, एकदा तपासणी झाली की, अहवाल तयार केला जाईल आणि त्यानंतरची पान २ ▶

---

# रोहन हरमलकरला अटक; १४ दिवसांची ईडी कोठडी

टीम दैनिक हेराल्ड

## हरमलकर १६०० कोटींच्या मालमत्ता व्यवहार प्रकरणाचा मास्टरमाइंड

**पणजी, दि. ४ :** सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) १६०० कोटी रुपयांच्या संशयित मालमत्ता व्यवहारप्रकरणी अखेर मुख्य संशयित रोहन हरमलकर याला अटक केली आहे. बुधवारी त्याला म्हापसा येथील न्यायालयात हजर करण्यात आले असता, न्यायालयाने त्याला १४ दिवसांची ईडी कोठडी सुनावली.

एप्रिल २०२५ मध्ये ईडीने हरमलकर याच्या पिळर्ण, पर्वरी, दिवाडी व इतर ठिकाणच्या निवासस्थानी व कार्यालयांवर छापे टाकले होते. या छाप्यांमध्ये हणजूण, हडफडे, आसगाव आणि इतर भागांतील एकूण १६०० कोटी रुपयांच्या जमिनी व स्थावर मालमत्तांचे दस्तावेज जप्त करण्यात आले होते. यामध्ये १,००० कोटींपेक्षा अधिक मूल्याच्या जमिनी तसेच ६०० कोटींहून अधिक किंमतीच्या इमारतींचा समावेश आहे. याशिवाय पिळर्ण येथील घरावरही सील ठोकण्यात आले होते.

ईडीकडून मिळालेल्या माहितीनुसार, रोहन हरमलकर याने गोव्यात मोठ्या प्रमाणात वादग्रस्त जमीन व्यवहार केले असून, त्याच्या विरुद्ध अनेक तक्रारी दाखल झाल्या होत्या. त्यात वडिलोपार्जित जमिनी हडप केल्याचा आरोप करणारी तक्रार आंतोनियो डिकॉस्टा यांनी विशेष तपास पथकाकडे केली होती. या प्रकरणात हवालाच्या माध्यमातून पैशांची देवाणघेवाण झाल्याचा संशय आल्यामुळे तपास ईडीकडे सोपविण्यात आला होता.

दुसऱ्या एका प्रकरणात, बार्देशचे तत्कालीन निबंधक अर्जुन शेट्ये यांनी पान २ ▶

---

# पावसात गळक्या शाळेची पालकांना चिंता

टीम दैनिक हेराल्ड

## विद्यार्थ्यांची उपस्थिती धोक्यात

**फोंडा, दि. ४ :** तारिवाडा–शिरोडा येथील सरकारी प्राथमिक शाळा आणि अंगणवाडी शाळेची इमारत पावसाळा सुरू होतानाही अद्याप दुरुस्त न झाल्यामुळे पालकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. शाळा आजपासून पुन्हा सुरू झाल्या असताना इमारतीच्या छतामधून पाणी गळत असून वर्गातील फरशा तुटलेल्या आणि ओली झाल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

संबंधित शाळेत प्राथमिक विभागात १२ विद्यार्थी दाखल आहेत. मात्र, इमारतीची दुर्दशा पाहता दोन पालकांनी आपल्या मुलांना शाळेतून काढून घेतल्याची माहिती समोर आली आहे. शाळेतील छत दुरुस्त न झाल्यामुळे वर्गात पाणी साचत असून विद्यार्थी भिजलेल्या फरशांवर बसण्यास भाग पडत आहेत. यामुळे अपघाताची भीती तसेच आरोग्याच्या समस्याही उद्भवू शकतात, असे पालकांचे म्हणणे आहे.

शाळेच्या दुरुस्तीचे काम बऱ्याच आधी मंजूर झाले होते, परंतु संबंधित कंत्राटदाराने अद्याप काम पूर्ण केलेले नाही, अशी माहिती स्थानिकांकडून मिळाली आहे. पालकांनी बुधवारी सकाळी मुलांना शाळेत सोडताना जे दृश्य पाहिले ते धक्कादायक होते. फरशा उखडलेल्या, वर्गात पाणी साचलेले आणि सुरक्षिततेचा पूर्ण अभाव.

दरम्यान, अंगणवाडी वर्गातही अशीच स्थिती असून फरशी जमिनीवर टाकलेल्या आहेत. या फरशाही ओली होत असल्याने लहान मुलांना सर्दी, ताप होण्याची भीती पालकांनी व्यक्त केली आहे. बालवाडी विभागात सध्या १० मुलांची नोंदणी झाली असून पालकांनी शासनाकडे त्वरित हस्तक्षेप



करण्याची मागणी केली आहे. पावसाळा सुरू झाल्यानंतर देखील दुरुस्तीचं काम प्रलंबित असणं ही मोठी दुर्लक्षाची बाब आहे. लहान मुलांच्या सुरक्षेसाठी शासनाने तातडीने लक्ष घालावे, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

---

# कुडतरी ग्रामस्थांनी बंद पाडले बेकायदेशीर भूखंड विकासाचे काम

टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ४ :** कुडतरीच्या पंचभाट गावात बेकायदेशीर भूखंड विकासाच्या कामांवर बुधवारी तणाव निर्माण झाला. एक लाख चौरस मीटरपेक्षा अधिक क्षेत्रफळ असलेल्या वादग्रस्त जमिनीवर चालू असलेल्या कामांवर स्थानिकांनी रोष व्यक्त करत ती तात्काळ थांबवली.

वादग्रस्त मालमत्ता सर्वे क्रमांक ४४९/०, ४५१ आणि ४५२ ही कुडातरी पंचायतीच्या हद्दीत येते. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, या भूखंडांचे उपविभाजन आणि विकास कोणत्याही अधिकृत परवानगीशिवाय सुरू करण्यात आले होते.

या प्रकाराची माहिती मिळाल्यानंतर माजी जिल्हा पंचायत सदस्य आणि काँग्रेस नेते मोरेनो रेबेलो यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी थेट हस्तक्षेप करत बेकायदेशीर विकास थांबवण्याची मागणी केली. यानंतर हे प्रकरण प्रकाशझोतात आले.

पोलिस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी हजर होत परिस्थितीचा आढावा घेतला. मात्र, त्वरित कारवाई करण्यात ते असमर्थ असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. स्थानिकांचा वाढता दबाव लक्षात घेऊन शेवटी फ्लाइंग स्क्वॉड आणि वन विभागाच्या अधिकाऱ्यांना तपासासाठी पाचारण करण्यात आले. या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत अखेर मालमत्तेवरील सर्व विकासकामे त्वरित थांबवण्यात आली.

पत्रकारांशी संवाद साधताना मोरेनो रेबेलो यांनी स्पष्टपणे सांगितले की, हा प्रकल्प कुठल्याही परिस्थितीत पुढे जाऊ दिला जाणार नाही.तसेच त्यांनी या जमिनीच्या कायदेशीर पान २ ▶